भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ०५.०८.२०२० ते ०९.०८.२०२०)

अंक ६१/२०२० | दिनांक ०४.०८.२०२० | अंक ५५/२०२०

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२८/०७/२०२० ते ०३/०८/२०२० पर्यंत) | | | | | | | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०५/०८/२०२० ते ०९/०८/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/०७ | २९/०७ | ३०/०७ | ३१/०७ | ०१/०८ | ०२/०८ | ०३/०८ | दिनांक | ०५/०८ | ०६/०८ | ०७/०८ | ०८/०८ | ०९/०८ |
| ०.८ | ३२.४ | ९.० | १५.४ | ४.६ | २१.२ | ४८.८ | पाऊस (मि. मी) | ७३ | ७१ | ९२ | ८६ | ६१ |
| ३१.० | ३१.० | २९.० | ३०.० | ३०.० | ३०.० | ३०.० | कमाल तापमान (अं. से) | २९ | २९ | २९ | ३० | ३० |
| २४.५ | २४.५ | २४.० | २४.० | २३.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | २१ | २१ | २१ | २१ | २२ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ७ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९३ | ९७ | ९८ | ९६ | ९८ | ९७ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९० | ९० | ९१ | ९२ | ९२ |
| ९२ | ७८ | ९८ | ८३ | ७८ | ९२ | ९८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ८८ | ८६ | ८४ | ८६ |
| ०.८ | ०.२ | ०.१ | ०.० | १.६ | १.६ | ०.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०३१ | ०२६ | ०२० | ०१६ | ०१६ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमे कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमे कडे |
| स्थिर | स्थिर | स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | २७३९.० | २७३५.८ | २५७.८ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:**

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक ५ ते ९ ऑगस्ट दरम्यान बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे त्याचबरोबर तापमानामध्ये काहि अंशी घट होऊन हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.

इशाराः सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ५ व ६ ऑगस्ट रोजी काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार त्याचबरोबर तुरळक ठिकाणी अत्यंत मुसळधार तर दिनांक ७ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार व दिनांक ८ व ९ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | कमाल फुटवे | येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने शेतातील पाण्याची पातळी २.५ ते ५ से.मी. राखण्यासाठी खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भात पिकास शक्यतो नत्र खताची मात्रा देणे पुढील ३ दिवसांसाठी पुढे ढकलावे.<br>जिल्ह्यामध्ये पाणथळ ठिकाणी भातावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. निळे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस ४० मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १२.५ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन पावसाची उघडीउ पाहून फवारावे.<br>भात पिकांवर किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणुन भात खाचराचे बांध स्वच्छ ठेवावेत व बांधावरील वाढलेल्या तणांच्या नियंत्रणासाठी पावसाची ऊघडीप पाहून ग्रामोक्झोन हे तणनाशक ३ मिलि प्रती लिटर पाण्यात मिसळुन बांधावर फवारावे. |
| नागली | रोप अवस्था | काही ठिकाणी पुर्नलागवड करुन १ महिना झाला असला तरी येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने नागली पिकास शक्यतो नत्र खताची मात्रा देणे पुढील ३ दिवसांसाठी पुढे ढकलावे.<br>पावसाची उघडीप पाहून नागली पिकामध्ये पुर्नलागवडीनंतर २ आठवड्यांनी तणांची बेणणी करावी.<br>येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने नागली पिकामधील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| भुईमुग | रोप अवस्था | येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भुईमुग पिकामधील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>भुईमुगाच्या लागवडीमध्ये अतिरिक्त पाण्याचा योग्य निचरा करावा व पावसाची उघडीप पाहून पेरणीनंतर २० दिवसांनी बेणणी करावी. |
| आंबा | नवीन पालवी | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना बांबुच्या काठीचा आधार देऊन बुध्यांना मातीची भर द्यावी तसेच कलमांचे बुंधे तणविरहीत व स्वच्छ ठेवावेत.<br>येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने आंबा पिकास पॅक्लोब्युट्रॉझॉल देणे पुढील ३ दिवसांसाठी पुढे ढकलावे.<br>आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास, नियमीत फळधारणेसाठी कलमांना 15 जूलै ते 31 ऑगस्ट या दरम्यान 10 वर्षावरील कलमांना पॅक्लोब्यूट्रॉझॉल द्यावे. मागील पंधरवडयात पावसाच्या उघडीपमूळे आंबा झाडांना नवीन पालवी आली असून त्या पालवीचे तूडतूडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा |
| काजु | नवीन लागवड | येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने काजु पिकास रासायनिक व सेंद्रीय खतांची मात्रा देणे पुढील ३ दिवसांसाठी पुढे ढकलावे.<br>येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या काजु कलमांना बांबुच्या काठीचा आधार देऊन बुध्यांना मातीची भर द्यावी तसेच कलमांचे बुंधे तणविरहीत व स्वच्छ ठेवावेत.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |
| नारळ व सुपारी | नवीन लागवड | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळ व सुपारीच्या रोपांना बांबुच्या काठीचा आधार देऊन बुध्यांना मातीची भर द्यावी तसेच रोपांचे बुंधे तणविरहीत व स्वच्छ ठेवावेत. |
| भाजीपाला | फुलोरा ते फळधारणा | येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भाजीपाल्यास शक्यतो नत्र खताची मात्रा देणे पुढील ३ दिवसांसाठी पुढे ढकलावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप च. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवत च. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१